## महाराष्ट्र शासन

क्रमांक:बीएड-४६१८/प्र.क्र.१८९/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३१ जुलै, २०१८

- 3 AUG 2018
4348
- 6 AUG 2018

प्रति,
कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे.

**विषय :- बी.एस्सी.बी.एड हा ४ वर्षीय (एकात्मिक) अभ्यासक्रमास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

संदर्भ :- National Council for Teacher's Education, Western Regional Committee, Bhopal यांचे पत्र क्र.WRC/APP201660156/B.Sc.B.Ed./278th/MH/2017/188365, दि.१४.८.२०१८ व क्रमांक: WRC/APP201660156/corrigendum/2018/198252, दिनांक ३१.५.२०१८.

महोदय,

विभागीय संचालक, राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद, पश्चिम क्षेत्रिय समिति, भोपाळ यांनी त्यांच्या क्र.WRC/APP201660156/B.Sc.B.Ed./278th/MH/2017/188365, दिनांक १४.८.२०१८ व क्रमांक: WRC/APP201660156/corrigendum/2018/198252, दिनांक ३१.५.२०१८ च्या आदेशान्वये महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्युकेशन सोसायटीचे एच.जी.एम. आझम कॉलेज ऑफ एज्युकेशन, के. बी. हिदायतुल्ला रोड, ता.हवेली, जि. पुणे या शिक्षणशास्त्र महाविद्यालयास National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, 2014 मधील नवीन निकषांनुसार काही अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून वार्षिक ५० विद्यार्थी (one basic unit) प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी.बी.एड ४ वर्षीय (एकात्मिक) हा अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र कॉस्मोपोलिटन एज्युकेशन सोसायटीचे एच.जी.एम. आझम कॉलेज ऑफ एज्युकेशन, के. बी. हिदायतुल्ला रोड, ता.हवेली, जि. पुणे या शिक्षणशास्त्र महाविद्यालयास सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून वार्षिक ५० विद्यार्थी (one basic unit) प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी.बी.एड ४ वर्षीय (एकात्मिक) हा अभ्यासक्रम कायम विना अनुदान तत्त्वावर सुरु करण्यास खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) एन.सी.टी.ई., पश्चिम क्षेत्रीय समिती, भोपाळ यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

२) एन.सी.टी.ई., पश्चिम क्षेत्रीय समिती, भोपाळ यांनी अभ्यासक्रमाची मान्यता रद्द केल्यास संबंधित अभ्यासक्रमासाठी शासनाने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल.

३) एन.सी.टी.ई., पश्चिम क्षेत्रीय समिती, भोपाळ यांच्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे विहीत दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.

४) एन.सी.टी.ई, पश्चिम क्षेत्रिय समिती, भोपाळ यांनी National Council for Teachers Education (Recognition, Norms and Procedure) Regulation, २०१४ नुसार विहित केलेल्या सुधारीत निकषांची पुर्तता करण्यात आल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

५) सदर अभ्यासक्रमास प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२७.५.२०१३ व शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.१८.६.२०१४ अन्वये विहित केलेल्या अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील.

(ह. व्यं. पऱ्हाते)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे,
प्राचार्य, एच.जी.एम. आझम कॉलेज ऑफ एज्युकेशन, २३९० बी, के. बी. हिदायतुल्ला रोड, कॅम्प, पुणे-४११ ००१.
निवडनस्ती (मशि-२)